# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई

दि. १५.०४.२०१७

## दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

**विषय :— श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यासाच्या महाप्रसाद विभागासाठी भाजीपाला पुरवठयासाठी दरपत्रक.**

वरील विषयात नमूद बाबींचा पुरवठा करण्यासाठी पुरवठादार/उत्पादकाकडून खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. **पुरवठा करावयाचा भाजीपाला याची यादी सोबत परिशिष्ठ 'अ' येथे जोडली आहे.** या संदर्भात अधिक माहितीची आवश्यकता असल्यास न्यासाचे सहा. पर्यवेक्षक, श्री. जनार्दन शिरवडकर यांच्याशी संपर्क साधावा.

अटी व शर्ती :—

१) परिशिष्ट **अ** येथे नमूद भाजीपाला दरपत्रक स्विकारल्यानंतर ६ महिन्याच्या कालावधीसाठी पुरवठा करणे आवश्यक आहे.

२) परिशिष्ट **अ** येथे नमूद भाजीपाल्याचे दर स्वतंत्रपणे नमूद करणे आवश्यक आहे.

३) भाजीपाल्याच्या दरात वाढ झाली तरी दरपत्रकात नमूद दर हे ६ महिने किंवा त्या पुढील दरकरार होईपर्यत कायम राहतील.

४) प्रत्येक निविदाकाराने फक्त १ दरपत्रक सादर करावे.

५) निविदाकाराने VAT/CST क्रमांक दरपत्रकात नमूद करावा.

६) निविदाकारास VAT/CST क्रमांक लागू नसल्यास, तत्सम प्राधिकरणाकडीत नोंदणी क्रमांक असलेल्या लेटर हेडवर दरपत्रक सादर करावे व दरपत्रके सादर करतांना पॅन कार्डची दुय्यम प्रत सोबत जोडावी.

७) दरपत्रक स्वीकृत केल्यानंतर न्यासाच्या गरजेनुसार व निकडीनुसार भाजीपाल्याची मागणी करण्यात येईल. भाजीपाल्याच्या पुरवठयासंदर्भात न्यासाकडून पुरवठा आदेश निर्गमित केल्यानंतर मागणी केलेला भाजीपाला तात्काळ व अस्सल दर्जाचा पुरवठा करणे पुरवठादारावर बंधनकारक राहील. पुरविण्यात आलेला माल खराब असल्याचे आढळल्यास तो माल बदलून त्याऐवजी चांगला माल देणे बंधनकारक राहील.

८) पुरवठा आदेशानुसार पुरवठा केल्यानंतर देयकाची रक्कम फर्मच्या नावे आरटीजीएसच्या मार्फत अदा करण्यात येईल.

९) सिलबंद लखोटयावर दरपत्रक सूचना दिनांक व सूचनेत नमूद विषयाचा उल्लेख करण्यात यावा.

१०) दरपत्रके सिलबंद लखोटयात **सोमवार, दि. २४.०४.२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यत** न्यासाच्या तिसऱ्या मजल्यावरील नोंदणी शाखेत सादर करावीत.

११) **सोमवार, दि. २४.०४.२०१७ रोजी दुपारी २.००** वाजता तिसऱ्या मजल्यावरील समिती कक्षात दरपत्रके उघडण्यात येतील. दरपत्रके उघडण्याच्या वेळी पुरवठादार किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांनी कृपया उपस्थित रहावे.

( रवि जाधव ) १५/४

उप कार्यकारी अधिकारी

परिशिष्ट - अ

| क्र. | भाज्यांची नावे | ६ महिने / कि. | क्र. | भाज्यांची नावे | ६ महिने / कि. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | टोमॅटो | १२२० | 26 | कारले | २४ |
| 2 | बटाटा | १२८० | 27 | छोटी भरीत वांगी | २५ |
| 3 | प्लावर | १७० | 28 | मशूरुम | १५ |
| 4 | मिरची | ७५ | 29 | चवळीच्या शेंगा | १० |
| 5 | फरस बी | ४० | 30 | शापू | १२ |
| 6 | कोबी | २२० | 31 | सुरण | ७० |
| 7 | वांगी | ८० | 32 | बेबी कॉन | १८ |
| 8 | सिमला मिरची | ६५ | 33 | भोपळा | २० |
| 9 | भेंडी | ९० | 34 | भजीची मिरची | ३० |
| 10 | शेवगा शेंगा | २० | 35 | शिराला | १०० |
| 11 | दुधी | ४० | 36 | मक्याचे दाणे | २५ |
| 12 | वाटाणा शेंगा | १२० | 37 | पडवळ | ३० |
| 13 | गवार | ४५ | 38 | रताळे | ८ |
| 14 | तोंडली | ८५ | 39 | लाल माठ | ४५ |
| 15 | अद्रक | ९५ | 40 | चवळी पालेभाजी | १५ |
| 16 | गाजर | ९० | 41 | भाजी अळु जुडी | ४० |
| 17 | काकडी | ९० | 42 | पुदीना | ४५ |
| 18 | बीट | १० | 43 | कांदा | ५०० |
| 19 | लसूण | ८० | 44 | आरबी | ६० |
| 20 | कोथंबीर | ३३० | 45 | मुला | १२ |
| 21 | मेथी | १६० | 46 | परवळ | ३ |
| 22 | पालक | १५० | 47 | कैरी | ६ |
| 23 | कडीपत्ता | २५ | 48 | पापडी | १८ |
| 24 | लिंबू | ४०० | 49 | मायाळू भाजीची जुडी | १५ |
| 25 | केळीचे पान | ६० | 50 | समुंद्र मेथी जुडी | ६०० |